नि. फौ. खटला क्र. **२४४/२०२३**
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी ३०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १० ची जबानी**
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : गणेश रमेशराव सोळंके,
वय : ४० वर्षे,
धंदा : नौकरी, पोलीस हेड कॉस्टेबल,
नेमणुक : अकोट शहर पो.स्टे
राहणार : ह.मु. अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. ३०/०७/२०२३ रोजी मी पोलीस ठाणे अकोट शहर येथे पोलीस हेड कॉस्टेबल म्हणुन कर्तव्यावर होतो. सदर दिवशी मला प्रस्तुत गुन्ह्याचा तपास सोपवण्यात आला होता. प्रस्तुत गुन्ह्याच्या तपासाकामी मला प्रथम खबर अहवाल, केस डायरी व वैद्यकिय रिपोर्ट इ. कागदपत्रे देण्यात आली होती. मी दोन पंचांना समज पत्र देउन घटनास्थळ पंचनामा तयार केला. सदर घटनास्थळ अकोट शहरात टाकपुरा भागात होते. पंचांना दिलेले समजपत्र आता मला दाखवले. त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर समजपत्रास **निशाणी ३१** देण्यात येते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर घटनास्थळ पंचनामा निशाणी २२ वर नमुद आहे. तपासाकामी मी साक्षीदारांचे बयान नोंदवले.

२. साक्षीदार क्र. ८ सरवण कहार याचे बयान मी त्याचे सांगण्याप्रमाणे नोंदवले होते. त्याचे जबाबातील अधोरेखांकित भाग अ हा देखील त्याचे सांगण्यानुसार नोंदवण्यात आला आहे. सदर अधारेखांकित भागास **निशाणी ३२** देण्यात येते.

३. साक्षीदार क्र. ९ पवण कहार याचे बयान मी त्याचे सांगण्याप्रमाणे नोंदवले होते. त्याचे जबाबातील अधोरेखांकित भाग अ हा देखील त्याचे सांगण्यानुसार नोंदवण्यात आला आहे. सदर अधारेखांकित भागास **निशाणी ३३** देण्यात येते.

४. त्यानंतर मी आरोपींना समज पत्र दिले. तपासादरम्यान मी आरोपी क्र. २ याचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरलेला लोखंडी रॉड दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा तयार करून जप्त केला. आता मला सदर जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी, आरोपीची सही असुन दोन पंचांच्या देखील सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर जप्ती पंचनाम्यास **निशाणी ३४** देण्यात येते. निशाणी ३४ वरिल पंचनाम्याकामी हजर राहण्यासाठी पंच साक्षीदारांना लेखील समज पत्र दिले होते. सदर समजपत्र मी अभिलेखात सामील केले असुन आता मला दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असुन दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ३५** देण्यात येते.

५. जप्त लोखंडी रॉडची वेपन क्युरी कामी वैद्यकीय अधिकारी यांना मी पत्र दिले. सदर पत्र मला दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पत्रास **निशाणी ३६** देण्यात येते. निशाणी ३६ ला अनुसरून प्राप्त अभिप्राय मी अभिलेखात सामील केलेला आहे. निशाणी ३५ नुसार जप्त लोखंडी रॉड माल खान्यात जमा करून त्याबाबत जमा पावती प्राप्त केली. सदर पावती आता मला दाखवण्यात आली. त्यावर मुद्देमाल मोहरर यांची सही आहे. सदर पावतीस **निशाणी ३७** देण्यात येते.

६.	त्यानंतर मी फिर्यादीचा भाउ व फिर्यादीचे वडिल यांचे बयान नोंदवले. तपासाअंती आरोपींविरूध्द पुरावा मिळुन आल्याने प्रस्तुत दोषाराप पत्र न्यायालयात दाखल केले. मी आरोपींना पहिल्यास ओळखु शकतो. दोनही आरोपी न्यायालयासमक्ष आरोपीच्या पिंज—यात हजर आहे. **सरतपास पुर्ण.**

**(न्यायालयाच्या मध्यांतराची वेळ झाल्याने उलटतपास दुपारपावेतो तहकुब)**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०२.०२.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.

**मध्यांतरानंतर उलटतपासणी शपथेवर सुरू. दोन्ही आरोपींतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत —**

७.	मी साक्षीदारांचे बयान त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले होते. मला बयान देतांना साक्षीदार क्र. ५ पुष्पा सुभाष गौर हिने आरोपी क्र. १ व २ यांनी आम्हाला पाहुन हसीमजाक व छेडछाड केली असे सांगितले नव्हते.

८.	मला बयान देतांना साक्षीदार क्र. ५ पुष्पा हिने आरोपी क्र. १ याने आरोपी क्र. २ ला रॉड काढण्यास सांगितले असे सांगितले नव्हते.

९. साक्षीदार क्र. ६ वैष्णवी सुभाष गौर हिचे बयान देखील मी तिचे सांगण्यानुसार नोंदवले होते. मला बयान देतांना साक्षीदार क्र. ६ वैष्णवी हिने आरोपी क्र. १ याने मला व फिर्यादीला हात–बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली असे सांगितले नव्हते. साक्षीदार सांगतो की, तिने लोट लाट केली व थापडा–बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली असे मला सांगितले होते.

१०. मला बयान देतांना साक्षीदार क्र. ६ वैष्णवी हिने तिचे वडिल बेशुध्द झाले होते असे सांगितले नव्हते.

११. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार क्र. ८ व ९ यांनी त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग मला सांगितले नव्हता.

१२. घटनास्थळावर मी दोन ते तीन वेळा गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजुला लोकवस्ती आहे. मी घटनास्थळाच्या आजुबाजुच्या लोकांकडे घटनेबाबत चौकशी केली होती.

१३. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेलो व घ ाटनास्थळ पंचनामा तयार केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ कडुन कोणतीही जप्ती झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जप्ती पंचनामा तयार केला आहे. मी तपासादरम्यान जखमी सुभाष गौर याचे कपडे जप्त केले नाही. साक्षीदार सांगतो की, मला त्याची आवश्यकता भासली नाही.

१४. आरोपी क्र. १ याने फिर्यादी तसेच सुभाष व वैष्णवी यांचेविरूध्द त्याच्या वाहनाची तोडफोड केल्याबाबत पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला होता किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरूध्द कोणताही गुन्हा निष्पन्न होत

नसतांना मी खोटा तपास करून खोटे दोषारोप पत्र दाखल केले व आज खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०२.०२.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.